MHWR030009882022

दाखल दिनांक :१४/०२/२०२२
नोंदणी दिनांक :१४/०२/२०२२
निकाल दिनांक :१३/०८/२०२६
कालावधी :०४ व. ०५ म. १७ दि.

## "भाग अ"

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (फौजदारी न्यायालय क्र. १) वर्धा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : विक्रांत प्र. खंदारे)

(निकाल घोषित दिनांक १३/०८/२०२६)

**नि.फौ.ख.क्र. १४२/२०२२**

पोलीस स्टेशन वर्धा शहर, पहिली खबर क्र. ०३/२०२२

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र सरकार<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी<br>वर्धा शहर पोलीस स्टेशन, जि. वर्धा. |
| सरकार तर्फे विधीज्ञ | | श्री. ए. एस. पठाण. |
| आरोपी | | प्रमोद सुखदेव चुनारकर,<br>वय : ४४ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा. सिध्दार्थ नगर, वर्धा, ता. जि. वर्धा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | श्री. एम. डब्ल्यु. बेग. |

## "भाग ब"

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | दिनांक ०२/०१/२०२२ |
| प्रथम खबरी अहवाल नोंदविल्याची तारीख | दिनांक ०२/०१/२०२२ |
| दोषारोप/अर्ज/तक्रार दाखल तारीख | दिनांक १४/०२/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | दिनांक ०८/०१/२०२४ |
| पुरावा प्रारंभ होण्याची तारीख | दिनांक ०५/०२/२०२४ |
| न्यायनिर्णयास राखून ठेवण्याची तारीख | दिनांक १३/०८/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल | दिनांक १३/०८/२०२६ |

आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमिनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाची कलमे | दोषी किंवा निर्दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.कलम ४२८ नुसार खटल्याचे दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रमोद सुखदेव चुनारकर | १०/०१/२०२२ | १०/०१/२०२२ | भा.दं.वि. चे कलम ३२४ व ५०४ | दोषी | होय. | ०० |

## "भाग क"

**अभियोग पक्षातर्फे / बचावपक्षातर्फे / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

अ) अभियोग पक्षातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१ | अविनाश धर्मपाल रामटेके | ०८ | फिर्यादी व जखमी |
| ०२ | आकाश प्रमोद मुन | ११ | घटनास्थळ पंच |
| ०३ | आशिष सुखदेव चुनारकर | १३ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ०४ | अपेक्षा अविनाश रामटेके | १५ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ०५ | शैलेश मधुकरराव चाफलेकर | १६ | तपासी अधिकारी |
| ०६ | राजीव अरविंद रामटेके | २२ | वैद्यकीय अधिकारी |

ब) बचाव पक्षातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

क) न्यायालयातर्फे

| क्रमांक | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

**अभियोग पक्षातर्फे / बचावपक्षातर्फे / न्यायालयातर्फे निशानी ची यादी**

अ) अभियोग पक्षातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | ०९ व १० | फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवाल |
| ०२ | १७ | सुचनापत्र |
| ०३ | १८ | घटनास्थळ पंचनामा |
| ०४ | १९ | जप्ती पत्रक |
| ०५ | २० | क्युरीकरीता दिलेली तहरीर |
| ०६ | २१ | सा.क्र. ३ आशिषचे बयाणातील अधोरेखित भाग अ |
| ०७ | २३ | वैद्यकीय अहवाल |
| ०८ | २४ | इन्ज्युरी रिपोर्ट |
| ०९ | २५ | क्युरी अहवाल |

ब) बचाव पक्षातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

क) न्यायालयातर्फे

| क्रमांक | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|
| ०१ | निरंक | ... |

ड) मुददेमालाचे वर्णन

| क्रमांक | मुददेमाल / अर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | एम.ओ.क्र. १ | चाकु |

## <u>न्यायनिर्णय</u>

( घोषित दिनांक १३/०८/२०२६ )

प्रस्तुत प्रकरणात आरोपी भारतीय दंड विधाना (थोडक्यात भा.दं.वि.) चे कलम ३२४ व ५०४ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयांच्या आरोपाखालील खटल्यास सामोरे जात आहे.

<u>अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात येणे प्रमाणे</u> :

२. दिनांक ०२/०९/२०२२ रोजी रात्री ०८:१५ वाजताच्या सुमारास सिध्दार्थ नगर, वर्धा, ता. जि. वर्धा येथे फिर्यादी त्याचा मित्र आशिष चुनारकर याच्या घरी गेला असता तेथे आरोपीने फिर्यादीला *'तु माझे भावाचे घरी का आला'* असे म्हणून *'तु जास्त माजला का'* अशी शिवीगाळ करून कांदे कापण्याचे चाकुने फिर्यादीचे डावे हाताचे काखेत मारहाण करून त्यास जखमी केले. त्यामुळे फिर्यादीने वर्धा शहर पोलीस स्टेशन, जि. वर्धा येथे आरोपीविरुध्द तक्रार दिली.

३. सदर फिर्यादीनुसार आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन वर्धा शहर, जि. वर्धा येथे भा. दं. वि. चे कलम ३२४ व ५०४ अन्वये गुन्हा क्र. ०३/२०२२ नोंदविण्यात आला. तपासाअंती पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, वर्धा शहर यांनी आरोपीविरूध्द सदर गुन्हयांकरिता न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४. न्यायालयात दोषारोपपत्र सादर झाल्यानंतर दि. ०८/०१/२०२४ रोजी आरोपीविरूध्द नि.क्र. ०६ वर भा. दं. वि. चे कलम ३२४ व ५०४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आले. आरोपीचे प्रतिकथन नि.क्र. ०७ वर स्वतंत्र नोंदविण्यात आले. त्यामध्ये त्याने त्याला सदर गुन्हे कबुल नसल्याचे सांगुन संपरिक्षेची तयारी दर्शविली.

<u>अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा गोषवारा</u> :

५. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरूध्दचे दोष सिध्द करण्याकरीता एकूण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. अभिलेखावर *फिर्यादी व जखमी* – सा.क्र. १ अविनाश धर्मपाल रामटेके यांची साक्ष नि.क्र. ०८ वर, *घटनास्थळ पंच* – सा.क्र. २ आकाश प्रमोद मुन यांची साक्ष नि.क्र. ११ वर, *प्रत्यक्षदर्शी* – सा.क्र. ३ आशिष सुखदेव चुनारकर यांची साक्ष नि.क्र. १३ वर, सा.क्र. ४ अपेक्षा अविनाश रामटेके यांची साक्ष नि.क्र. १५ वर, *तपासी अधिकारी* – सा.क्र. ५ श्री. शैलेश मधुकरराव चाफलेकर यांची साक्ष नि.क्र. १६ वर आणि *वैद्यकीय अधिकारी* – सा.क्र. ६ श्री. राजीव अरविंद रामटेके यांची साक्ष नि.क्र. २२ वर नोंदविण्यात आली.

त्यानंतर अभियोगपक्षाने आपला पुरावा बंद केला.

६. अभिलेखावर आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वयेचे बयाण नि.क्र. २६ वर नोंदविण्यात आले. सदर जबाबाचे व आरोपीमार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासाचे अवलोकन केले असता आरोपीने त्याचेविरूध्दचा संपुर्ण पुरावा खोटा असल्याचे सांगून बचावाचा पावित्रा घेतल्याचे दिसून येते. आरोपीने त्याचे बचावामध्ये कोणताही साक्षीदार तपासला नाही अथवा कागदोपत्री पुरावा सादर केला नाही.

७. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचा उहापोह केला. तसेच विद्वान सहायक सरकारी वकिल व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तिवाद ऐकला. त्या अनुषंगाने माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत. त्या मुद्यांवरील कारणमिमांसा व निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | **<u>विचाराधीन मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०२/०९/२०२२ रोजी रात्री ०८:१५ वाजताच्या सुमारास सिध्दार्थ नगर, वर्धा, ता. जि. वर्धा येथे आरोपीने फिर्यादीला चाकु या शस्त्राने त्याचे डावे हाताचे काखेत मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली ? | ... होय. |
| **२.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद वेळी, स्थळी व दिवशी आरोपीने फिर्यादीला सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उद्देशाने प्रवृत्त करून शिवीगाळ केली ? | ... नाही. |
| **३.** | अभियोगपक्षाने आरोपीविरूध्द कोणता गुन्हा सिध्द केला काय ? | ... भा.दं.वि.चे कलम ३२४ |
| **४.** | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीला दोषी ठरवून शिक्षा देण्यात आली. |

## <u>कारणमीमांसा व निष्कर्ष</u>

### <u>मुद्दे क्र. १ ते ३ च्या संदर्भात</u> :

८. मुद्दे क्र. १ ते ३ हे आपसात निगडीत असल्याने घटनेची व पुराव्याची पुनर्रावृत्ती टाळण्याकरीता त्यांची कारणमिमांसा एकत्रित देण्यात येत आहे.

९. भा. दं. वि. चे कलम ३२४ व ५०४ अन्वये अभियोगपक्षाला हे सिध्द करावे लागेल की, आरोपीने फिर्यादीला शस्त्राने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहचविली आणि त्याला सार्वजनिक शांतता भंग करण्याच्या उददेशाने प्रवृत्त करुन शिवीगाळ करुन त्याचा अपमान केला. अभियोगपक्षातर्फे सदर दोष सिध्द करण्याकरीता एकुण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.

१०. अभियोगपक्षाचा सा.क्र. १ अविनाश हा प्रकरणातील फिर्यादी व जखमी असून त्याने त्याचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, घटना दोन वर्षापुर्वी रात्री ०६:४५ वाजताचे सुमारास घडली होती. त्यावेळी तो आरोपीचे लहान भावाचे घरी गाडी मागण्याकरीता गेला असता आरोपीने त्याला आई बहिणीच्या शिव्या देत होता. तसेच त्यावेळी आरोपीने त्याचे अंगावर चाकु उगारला. तो तो चाकु वाचवित असतांना त्याचे डावे हाताचे काखेत लागल्यामुळे त्याला ४ टाके लागले होते. त्यामुळे त्याने पोलिस स्टेशनला जावून नि.क्र. ०९ व १० वरील तक्रार दिली होती. त्यानंतर पोलिस घटनास्थळावर आले होते आणि त्याने पोलिसांना घटनास्थळ दाखविले होते.

११. त्याने पुढे कथन केले की, तो चाकु भाजी व फळ कापणारा चाकु होता व त्याला मुठ नव्हती. उलटतपासादरम्यान त्याने कबुल केले की, त्याचा मित्र आशिष हा आरोपीचा सावत्र भाउ असून त्यांचे पटत नव्हते आणि त्यामुळे आरोपीने आशिषविरूध्द पोलिसात तक्रार दिली होती. त्याने कबुल केले की, घटनेच्या दिवशी आरोपी व त्याचे भावामध्ये बाचाबाची झाली होती आणि ते पाहण्यासाठी तो त्यांचे घराजवळ उभा होता. त्याने पुढे कबुल केले की, तो घरी पोहचला त्यावेळी त्याचे घराच्यांनी त्याला जखमेतून रक्त निघत असल्याचे सांगितले होते. त्याने आरोपी व आशिषचे भांडण असल्यामुळे त्याने आरोपीविरूध्द खोटी तक्रार दिल्याचे नाकारले.

१२. अभियोगपक्षाचा सा.क्र. ३ आशिष हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्याने त्याचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, त्याला घटनेबाबत माहिती नाही आणि घटना कधीची आहे हे सुध्दा आठवत नाही. सदर साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयाणाच्या विसंगत साक्ष देत असल्याने विद्वान सहाय्यक सरकारी वकिलांनी त्यास उत्तरसुचक प्रश्ने विचारली असता त्याने अभियोगपक्षाच्या कथनास समर्थन दिले नाही. तसेच त्याने त्याचेसमक्ष आरोपीने फिर्यादीला चाकुने मारहाण केल्याचे नाकारले.

१३. अभियोगपक्षाची सा.क्र. ४ अपेक्षा ही फिर्यादीची पत्नी असून घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. तिने तिचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, दि.

०१/०२/२०२२ रोजी तिचे पती आरोपीचा भाउ आशिषकडे गाडी मागण्याकरीता गेले होते. त्यामुळे तिचे पती आशिषचे घरी का गेले या कारणावरून आरोपीने तिचे पतीला शिवीगाळ केली होती. त्यावेळी ती घरी होती आणि आवाज आल्यामुळे ती बाहेर आली तेव्हा तिला आरोपी व तिचे पतीची हातापाई चालु असल्याचे दिसले होते. त्यावेळी आरोपीने त्याचेकडील चाकुने तिचे पतीचे डावे बाजुचे काखेमध्ये मारहाण केली होती आणि त्यामुळे तिचे पतीने पोलिसात तक्रार दिली होती.

१४. तिने पुढे कथन केले की, चाकुने मार लागल्यामुळे तिचे पतीला ४ टाके लागले होते. उलटतपासादरम्यान तिने कबुल केले की, घटना रात्रीचे वेळी घडली होती आणि जानेवारी–फेब्रुवारी महिन्यात हिवाळा असल्याने लवकर अंधार पडतो. तिने कथन केले की, तिने पोलिसांना बयाण देतांना *'माझे पती गाडी मागण्याकरीता आशिषकडे गेल्याचे'*, 'मला काही वेळाने आवाज आल्याचे' आणि 'मी गेली तेव्हा हातापाई चालु होती' याबाबी सांगितल्या होत्या, परंतू त्या तिच्या पोलिस बयाणात का नमुद नाहीत याचे कारण ती सांगू शकत नाही. तिने कबुल केले की, आशिष व आरोपी हे सावत्र भाउ आहेत आणि त्यांचे आपसात पटत नाही. तसेच फिर्यादी व आशिष हे चांगले मित्र आहेत.

१५. तिने पुढे कबुल केले की, घटनेच्या वेळी ती आवाज आल्यानंतर गेली होती आणि तेथे नेमके काय घडले हे तिला तेथे गेल्यानंतर कळाले होते. तिने आशिषने तिचे पतीला तक्रार दयायला सांगितल्याचे आणि त्यामुळे त्याने खोटी तक्रार दिल्याचे व तिने खोटे बयाण दिल्याचे नाकारले. तसेच आरोपीने तिचे पतीला मारहाण अथवा शिवीगाळ केली नसल्याचे सुध्दा नाकारले.

१६. अभियोगपक्षाचा सा.क्र. २ आकाश हा प्रकरणातील घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार असून त्याने त्याचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, दि. ०३/०९/२०२२ रोजी पोलिसांनी त्याला कोणत्याही पंचनाम्याकरीता बोलविले नव्हते आणि त्याचेसमक्ष कोणताही पंचनामा केला नव्हता. त्याने सदर पंचनाम्यावरील त्याची सही ओळखून त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले. सदर साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयाणाच्या विसंगत साक्ष देत असल्याने विद्वान सहाय्यक सरकारी वकिलांनी त्यास उत्तरसुचक प्रश्ने विचारली असता त्याने अभियोगपक्षाच्या कथनास समर्थन दिले नाही.

१७. अभियोगपक्षाचे सा.क्र. ६ श्री. रामटेके हे प्रकरणातील वैद्यकीय अधिकारी असून त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले आहे की, ते दि.

०२/०१/२०२२ रोजी सामान्य रूग्णालय, वर्धा येथे कार्यरत असतांना पोलिस त्यांचेकडे जखमी नामे अविनाश धर्मपाल रामटेके यास वैद्यकीय तपासणी करीता घेवून आले होते. त्यामुळे त्यांनी सदर रूग्णाची पाहणी केली असता त्यांना त्याचे शरीरावर दोन जखमा आढळल्या होत्या. त्यापैकी पहिली जखम डावे काखेमध्ये ४ बाय ०.५ सें.मी. ची आणि दुसरी जखम त्याचे उजवे हाताचे कोप—यावर ३ बाय ३ सें.मी. ची खरचटल्याची होती. सदर दोन्ही जखमा ताज्या व साध्या स्वरूपाच्या होत्या आणि त्यापैकी पहिली जखम ही धारदार शस्त्राने व दुसरी टणक व बोथट वस्तुने झाली असावी.

१८. त्यांनी पुढे कथन केले की, त्यामुळे त्यांनी त्याचेवर उपचार करून त्याला पुढील तपासणीकरीता सर्जरी विभागाकडे पाठविले होते. त्यांनी त्याबाबत नि. क्र. २३ वरील वैद्यकीय अहवाल व नि.क्र. २४ वरील इन्ज्युरी रिपोर्ट दिला होता. त्यानंतर दि. १७/०१/२०२२ रोजी पोलिस त्यांचेकडे एक १५ बाय २ सें.मी. लांबीचा धारदार लोखंडी चाकु क्युरी करीता घेवून आले होते. त्यांनी सदर शस्त्राची पाहणी करून त्याबाबत नि.क्र. २५ वरील क्युरी अहवाल दिला होता. त्यांनी न्यायालयात एम.ओ. क्र. १ वरील चाकु तोच चाकु असल्याचे ओळखले. उलटतपासादरम्यान त्यांनी कबुल केले की, सदर रूग्णाला झालेल्या जखमा तो एखाद्या धारदार वस्तुवर किंवा नाली सारख्या ठिकाणी पडल्यास होवू शकतात. त्याने पुढे कथन केले की, त्यांनी सदर रूग्ण मद्याच्या अंमलाखाली आहे किंवा नाही याची तपासणी केली नव्हती. तसेच त्यांचेकडे सादर करण्यात आलेल्या चाकुवर रक्ताचे कोणतेही डाग नव्हते. त्यांनी खोटे प्रमाणपत्र व अहवाल दिल्याचे नाकारले.

१९. अभियोगपक्षाचे सा.क्र. ५ श्री. चाफलेकर हे प्रकरणातील तपासी अधिकारी असून त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये कथन केले आहे की, ते तपासादरम्यान सिध्दार्थ नगर, वर्धा येथे फिर्यादीचे घरासमोर घटनास्थळावर गेले होते आणि तेथे त्यांनी पंचांना नि.क्र. १७ वरील सुचनापत्र देवून त्यांचेसमक्ष नि.क्र. १८ वरील घटनास्थळाचा पंचनामा तयार केला होता. त्यानंतर त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदविले होते आणि आरोपीला सुचनापत्र देवून सोडले होते. आरोपीने त्यांना गुन्हयात वापरलेला चाकु काढून दिल्याने त्यांनी त्याबाबत पंचासमक्ष नि.क्र. १९ वरील जप्ती पत्रक तयार केले होते.

२०. त्यांनी न्यायालयात एम.ओ. क्र. १ वरील चाकु तोच चाकु असल्याचे ओळखले. त्यानंतर त्यांनी वैद्यकीय अधिकारी यांना सदर चाकुची क्युरी करून

मिळण्याकरीता नि.क्र. २० वरील तहरीर दिली होती आणि त्याच अहवाल प्राप्त केला होता. त्यांनी कथन केले की, सा.क्र. ३ आशिष याने त्यांना बयाण देतांना त्याचे बयाणातील नि.क्र. २१ वरील अधोरेखित भाग –अ सांगितला होता. त्यांना तपासादरम्यान आरोपीने फिर्यादीचे घरी जावून त्याला काखेमध्ये चाकुने मारहाण केल्याचे व दमदाटी केल्याचे निष्पन्न झाले होते आणि त्यामुळे त्यांनी आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. उलटतपासादरम्यान त्यांनी कथन केले की, त्यांना तपासादरम्यान आरोपी व फिर्यादी यांचेमध्ये जुना वाद असल्याचे आढळले नव्हते. तसेच प्रस्तुत प्रकरणापुर्वी फिर्यादीने आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिल्याबाबत त्यांना माहिती नाही. त्यांनी खोटा तपास केल्याचे व त्या आधारे खोटे दोषारोपपत्र सादर केल्याचे नाकारले.

२१. विद्वान सहायक सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, अभियोगपक्षाचे फिर्यादी व जखमी सा.क्र. १ अविनाश यांनी त्यांचे साक्षीमध्ये आरोपीने त्यास घटनेच्या वेळी शिवीगाळ करून चाकुने मारहाण केल्याचे कथन केलेले आहे. सदर बाबीला सा.क्र. ४ अपेक्षा हिने दुजोरा दिलेला आहे. आरोपीचे बचावाप्रमाणे फिर्यादीने त्याचा मित्र आशिष याचे आरोपीसोबत वाद असल्याने त्याचे सांगण्यावरून आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिली. परंतू सदर सा.क्र. ३ आशिष हा फितुर झाला असून त्याने आरोपीविरूध्द काहीही कथन केलेले नाही. यावरून आरोपीतर्फे घेण्यात आलेला बचाव खारीज करण्यास पात्र आहे.

२२. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, वैद्यकीय अधिकारी व तपासी अधिकारी यांचे कथनावरून घटनेमध्ये फिर्यादीला दुखापत झाल्याचे सिध्द होते. तसेच पंच साक्षीदार फितुर झाला असला तरी फिर्यादी व तपासी अधिकारी यांच्या कथनावरून घटनास्थळ सुध्दा सिध्द होते. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीने फिर्यादीला शस्त्राने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचविल्याचे संशयापलीकडे सिध्द करण्यास यशस्वी ठरला. करीता त्यांनी आरोपीला सदर गुन्हयाकरीता दोषी ठरवून जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली.

२३. त्याउलट आरोपीचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, अभियोगपक्षातर्फे फिर्यादी व्यतिरिक्त प्रकरणात कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. कथित प्रत्यक्षदर्शी सा.क्र. ३ आशिष याने त्याला सदर घटनेबाबत काहीही माहित नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच सा.क्र. ४ अपेक्षा हिने तिला घटनेबाबत ती तेथे गेल्यानंतर तिचे पतीकडून माहिती झाल्याचे

कथन केलेले आहे. यावरून सदर दोन्ही साक्षीदारांचे कथन अभियोगपक्षाच्या उपयोगाचे नाहीत. तसेच वैद्यकीय दस्तांवरून फिर्यादीला दुखापत झाल्याचे दिसून येत असले तरी वैद्यकीय अधिका—यांनी कबुल केल्याप्रमाणे सदर दुखापती या पडल्याने सुध्दा होवू शकतात. त्यामुळे सदर दुखापत आरोपीमुळे झाल्याचे सिध्द होत नाही.

२४. त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, अभियोगपक्षाचा सा.क्र. १ अविनाश याचे कथनामध्ये सुध्दा महत्वाच्या विसंगती आहेत. सदर साक्षीदाराने त्याचे पुराव्यामध्ये घटना सायंकाळी ०६:४५ वाजता घडल्याचे कथन केले आहे, परंतू नि. क्र. ९ वरील तक्रारीप्रमाणे घटना रात्री ०८:१५ वाजता घडली होती. तसेच त्याने त्यावेळी इतर साक्षीदारांच्या उपस्थितीबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे त्याचे कथनास दुजोरा मिळत नाही व त्याची साक्ष विश्वासार्ह नाही. आरोपी अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्यावर वाजवी शंका निर्माण करण्यास यशस्वी ठरला आणि तो सदर संशयाचा लाभ मिळण्यास पात्र आहे. करीता त्यांनी आरोपीला निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

२५. अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा उहापोह केला. तसेच विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विद्वान वकिल यांचा युक्तिवाद ऐकला.

२६. अभियोगपक्षाचा सा.क्र. १ अविनाश हा प्रकरणातील फिर्यादी व जखमी असून त्याने त्याचे साक्षीमध्ये घटनेच्या वेळी आरोपीने त्याला शिवीगाळ केल्याचे व चाकुने मारहाण करून डाव्या काखेमध्ये दुखापत पोहचविल्याचे कथन केलेले आहे. आरोपीचे विद्वान वकीलांनी सुचविल्याप्रमाणे सदर साक्षीदाराने सदर घटनेच्या वेळी तेथील सा.क्र. ३ आशिष अथवा सा.क्र. ४ अपेक्षा यांच्या उपस्थितीबाबत काहीही कथन केलेले नाही. परंतू नि.क्र. ९ व १० वरील तक्रारीवरून त्याचे कथनास दुजोरा मिळतो.

२७. तसेच सदरची घटना ही सन २०२२ मध्ये घडली असून त्याची साक्ष सन २०२४ मध्ये म्हणजे दोन वर्षांनंतर नोंदविण्यात आल्याने विद्वान सहायक सरकारी वकीलांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे सदर कालावधीच्या अंतरामुळे घटनेच्या वेळे मधील तफावत महत्वाची तफावत म्हणता येणार नाही. सदर साक्षीदाराने घटना ही सायंकाळी घडल्याचे कथन केलेले आहे. तसेच त्यानंतरच नि.क्र. ९ व १० वरील तक्रार नोंदविण्यात आल्या आणि नि.क्र. २४ वरील वैद्यकीय अहवालानुसार त्यानंतर रात्री ९ वाजताचे सुमारास त्याची वैद्यकीय तपासणी झाली. यावरून त्याचे घटनेच्या

वेळेबाबतचे कथनास दुजोरा मिळतो.

२८. आरोपीतर्फे सा.क्र. १ अविनाश, सा.क्र. ४ अपेक्षा व सा.क्र. ५ श्री. चाफलेवार यांना उलटतपासादरम्यान विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या स्वरूपावरून आरोपीने फिर्यादीने त्याचा मित्र आशिष याचे आरोपीसोबतच्या जुन्या वादामुळे आरोपीविरूध्द खोटी तक्रार दिली असल्याचा बचाव घेतल्याचे दिसून येते. परंतू हे येथे उल्लेखनीय ठरते की, अभियोगपक्षाचा सदर सा.क्र. ३ आशिष याने त्याचे साक्षीमध्ये घटनेबाबत काहीही कथन केलेले नाही. तसेच आरोपीमार्फत सुध्दा त्याचा उलटतपास नाकारण्यात आला असून त्याला आरोपीविरूध्दच्या पुर्व वैमन्यस्याबाबत काहीही विचारण्यात आलेले नाही. त्यामुळे सदरचा बचाव सिध्द होत नाही आणि तो तर्कसंगत सुध्दा वाटत नाही. त्यामुळे त्यावरून अभियोगपक्षाच्या पुराव्यावर वाजवी शंका निर्माण होत नाही.

२९. वर नमुद केल्याप्रमाणे सा.क्र. १ अविनाश याने त्याचे साक्षीमध्ये घटनेच्या वेळी त्याचे पत्नीचे उपस्थितीबाबत काहीही कथन केलेले नाही. त्यामुळे सदर सा.क्र. ४ अपेक्षा हिची घटनास्थळावरील घटनेच्या वेळीची उपस्थिती संशयास्पद ठरते, परंतू तिचे कथन भारतीय पुरावा कायदयाचे कलम ६ अन्वये सुसंगत ठरते. तसेच सा.क्र. ६ श्री. रामटेके यांचे कथनावरून सदर दिवशी फिर्यादीला डावे काखेत आणि उजवे हाताचे कोप—यावर दुखापत झाल्याचे सुध्दा सिध्द होते. आरोपीमार्फत सदर साक्षीदारास सदरच्या दुखापती पडल्यामुळे सुध्दा होवू शकत असल्याचा बचाव घेण्यात आला, परंतू आरोपीमार्फत फिर्यादी सा.क्र. १ अविनाश अथवा त्याची पत्नी सा.क्र. ४ अपेक्षा यांना घटनेच्या वेळी फिर्यादी पडल्याबाबत आणि त्यामुळे त्यास दुखापत झाल्याबाबत कोणताही प्रश्न विचारण्यात आलेला नाही अथवा उलटतपासादरम्यान तसे सुचविण्यात आले नाही. त्यामुळे सदर बचाव सुध्दा संयुक्तीक वाटत नाही आणि त्यामुळे तो खारीज करण्यास पात्र आहे.

३०. त्याचप्रमाणे सा.क्र. ५ श्री. चाफलेवार यांनी कथन केल्याप्रमाणे त्यांनी आरोपीकडून प्रदर्श अ वरील शस्त्र जप्त केले होते आणि सा.क्र. ६ श्री. रामटेके यांचे कथनाप्रमाणे फिर्यादीला झालेल्या जखमा या सदर शस्त्राने होवू शकतात. सा.क्र. १ अविनाश व सा.क्र. ४ अपेक्षा यांनी त्यांच्या साक्षीमध्ये आरोपीने सदर शस्त्राने फिर्यादीस मारहाण करून दुखापत पोहचविल्याचे कथन केलेले आहे आणि आरोपीमार्फत त्याबाबत कोणतीही महत्वाची विसंगती निर्माण करण्यात आलेली नाही.

३१. भारतीय पुरावा कायदयाचे कलम १३४ नुसार एखादया वाद तथ्याच्या सिध्दतेकरीता कोणत्याही विहित संखेच्या साक्षीदारांची साक्ष महत्वाची नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे *Juman Vs. State of Bihar, (2017) 11 SCC 85* या आणि *Jamail Singh Vs. State of Punjab, (2009) 3 SCC 391* या न्यायनिर्णयांतील दृष्टांतानुसार साक्षीदारांची संख्या नाही तर त्यांचे पुराव्यातील गुणवत्तेवरून एखादे तथ्य हे सिध्द झाल्याचे समजता येते आणि त्यामुळे केवळ एका साक्षीदाराच्या सबळ पुराव्यावरून सुध्दा दोषसिध्दी करता येते. परंतू त्याकरीता सदरची साक्ष ही विश्वासार्ह असणे गरजेचे असते.

३२. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी—जखमी यास झालेली जखम ही त्याचे काखेत झालेली आहे. तसेच आरोपी हा फिर्यादीचे त्याचेविरूध्द वैमन्यस्य सकृतदर्शनी सिध्द करण्यास अपयशी ठरला. कोणताही व्यक्ती केवळ खोटी तक्रार करण्याकरीता स्वत:ला इजा पोहचवून घेईल आणि ती सुध्दा काखे सारख्या ठिकाणी हे संयुक्तीक वाटत नाही. त्यामुळे आरोपीमार्फत घेण्यात आलेल्या सुड बुध्दीच्या बचावावरून फिर्यादीचे कथनावर कोणताही संशय निर्माण होत नाही. अभियोगपक्षातर्फे सादर फिर्यादी सा.क्र. १ अविनाश याची साक्ष विश्वासार्ह असून ती आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्यास पुरेशी ठरते. तसेच त्यास सा.क्र. ४ अपेक्षा, सा.क्र. ५ श्री. चाफलेवार आणि सा.क्र. ६ श्री. रामटेके यांचे कथनावरून दुजोरा मिळतो.

३३. त्यामुळे अभिलेखावर उपलब्ध एकंदरीत पुराव्यावरून अभियोगपक्ष आरोपीने फिर्यादीला चाकु या शस्त्राने मारहाण करून इच्छापुर्वक साधी दुखापत पोहचविल्याचे सिध्द करण्याकरीता सबळ व विश्वासार्ह पुरावा सादर करण्यास यशस्वी ठरला. परंतू अभिलेखावर आरोपीने फिर्यादीला नेमके कोणते शब्द उच्चारून शिवीगाळ केली अथवा त्यामुळे फिर्यादीचा अपमान झाल्याबाबत पुरावा नाही.

३४. त्यामुळे माझे मते आरोपीने फिर्यादीला शस्त्राने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचविल्याचे संशयापलीकडे निष्पन्न होते, परंतू त्यावेळी आरोपीने फिर्यादीस अश्लील शिवीगाळ करून त्याचा अपमान केल्याचे निष्पन्न होत नाही. त्यामुळे आरोपीविरुध्द केवळ भा. दं. वि. चे कलम ३२४ अन्वयेचा गुन्हा आकर्षित होतो आणि भा. दं. वि. चे कलम ५०४ अन्वयेचा गुन्हा आकर्षित होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी आणि मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दे क्र. ३ व ४ च्या संदर्भात</u> :**

३५. वर नमुद कारणे व निष्कर्षांच्या अनुषंगाने आरोपीविरुध्द भा. दं. वि. चे कलम २९४ अन्वयेचा गुन्हा आकर्षित होत नसल्याने तो त्याकरिता निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. परंतु आरोपीविरुध्द भा. दं. वि. चे कलम ३२४ अन्वये शिक्षापात्र असलेला गुन्हा संशयापलीकडे आकर्षित होत असल्याने त्यास सदर गुन्हयाकरीता दोषी ठरविण्यात येते. तसेच आरोपीला सदर गुन्हयांकरीता दोषी ठरविण्यात आल्याने तो शिक्षेस पात्र आहे. परंतु आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियमाचा लाभ देणे अथवा आरोपी, त्याचे विद्‌वान वकिल व सहा. सरकारी अभियोक्ता यांचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकण्याकरीता प्रस्तुत न्यायनिर्णय तहकुब करण्यात येत आहे.

Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.08.13 15:32:14 +0530

दिनांक : १३/०८/२०२६
वेळ : दुपारी ०१:३५
ठिकाण : वर्धा

( विक्रांत प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
(फौजदारी न्यायालय क्र. १)

<u>न्यायनिर्णय पुर्ववत</u> :

३६. विद्‌वान सहा. सरकारी अभियोक्त्यांनी युक्तीवाद केला की, आरोपीने हेतुपूरस्पर फिर्यादीला इच्छापूर्वक शिवीगाळ व मारहाण केलेली आहे. सदर कृत्य हे पुर्ण विचारांती व तयारीने करण्यात आले होते. तसेच ते पुर्व वैमन्यस्यातून करण्यात आलेले आहे. यावरुन आरोपीचा फिर्यादीला शिवीगाळ व दुखापत करण्याचा उद्‌देश स्पष्ट होता हे दिसून येते. त्यामुळे समाजाला चांगला संदेश मिळण्यासाठी त्यांनी आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली. तसेच फिर्यादीला नुकसान भरपाई देण्याची सुध्दा विनंती केली.

३७. त्याउलट आरोपीच्या विद्‌वान वकिलांनी आरोपींविरुध्द सिध्द गुन्हा साध्या व किरकोळ स्वरुपाचा असून हा त्याचा प्रथम गुन्हा आहे. त्याची कोणतीही गुन्हेगारी पार्श्ववृत्ती नसून तो एक कौटुंबिक व जबाबदार नागरिक आहे आणि त्याचेवर कुटूंबाची जबाबदारी आहे. तसेच त्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची आहे. करिता त्यांना आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियमचा लाभ देण्याची अथवा सौम्य शिक्षा देण्याची विनंती केली.

३८. आरोपीविरुध्द सिध्द गुन्हा हा साध्या व किरकोळ स्वरुपाचा आहे. आरोपीसंबंधी अपराधी परिविक्षा अधिनियमचा लाभ देणे बाबत संबंधीत परिविक्षा अधिका—यांचा अहवाल मागविण्यात आला असता संधी व मुदत (नि.क्र. २७) देवून

सुध्दा तो अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाचे *MCD V/s. State of Delhi & Anr., AIR 2005 SC 2658* मधील निष्कर्षांनुसार अपराधी परिविक्षा अधिनियमाचा लाभ देण्याकरीता परिविक्षा अधिका—यांचा अहवाल गरजेचा आहे. त्यामुळे सदर अहवाला अभावी आरोपी अपराधी परिविक्षा अधिनियमाचा लाभ मिळण्यास पात्र नाही. परंतू अभिलेखावर आरोपीचे पुर्व वर्तणुकीबाबत व चारित्रयाबाबत कोणताही नकारात्मक अभिलेख उपलब्ध नाही.

३९. आरोपीविरूध्द सिध्द गुन्हयाचे स्वरुप बघता सदर गुन्हा जुन्या वादातून घडल्याचे दिसून येते. तसेच आरोपीची पूर्व वर्तणुक व चारित्र्याबाबत कोणताही नकारात्मक अभिलेख नसल्याने आरोपीतर्फे विद्वान वकिलांनी केलेल्या युक्तीवादाच्या अनुषंगाने माझेमते आरोपीबाबत सौम्य भुमिका घेवून त्यास सौम्य शिक्षा देता येईल. त्याचप्रमाणे फिर्यादीला झालेल्या त्रासाबाबत उचित भरपाई मिळणे क्रमप्राप्त ठरते. तसेच प्रकरणात जप्त मुद्देमाल एक जुना वापरता चाकु जमा असल्यास अपील कालावधीनंतर कायदेशीर विल्हेवाट लावण्याकरीता मा. जिल्हाधिका—यांकडे पाठविणे योग्य व उचित होईल.

४०. करीता, वर नमुद कारणे व निष्कर्षांच्या अनुषंगाने मी मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :

## **आदेश**

१. आरोपी प्रमोद सुखदेव चुनारकर यास फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ अन्वयेच्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपी प्रमोद सुखदेव चुनारकर यास फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(२) नुसार भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ अन्वयेच्या गुन्हयाकरीता दोषी ठरविण्यात येते आणि त्याकरीता त्यास न्यायालय उठेपर्यंतचा एक दिवसाचा साधा कारावास व रूपये १,०००/— द्रव्य दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते.

३. आरोपीने दंडाच्या रक्कमेचा भरणा केल्यास अपील कालावधीनंतर त्यापैकी रुपये ५००/— फिर्यादीस नूकसान भरपाई म्हणून

देण्यात यावे.

४. आरोपीचा जुना जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७—अ च्या अनुपालनाकरीता प्रत्येकी रुपये १५,०००/— चे नविन बंधपत्र व जमानत सादर करावी. सदर जामीन पुढील ६ महिन्यांकरीता अस्तीत्वात राहिल व त्यानंतर ते रद्द समजण्यात यावे.

६. प्रकरणात जप्त मुद्देमाल एक जुना वापरता चाकु जमा असल्यास अपील कालावधीनंतर कायदेशीर विल्हेवाट लावण्याकरीता मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे पाठविण्यात यावा.

७. आरोपीला तो प्रस्तुत न्यायनिर्णयास आव्हान देवू शकतात याची समज देण्यात आली.

८. या न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला त्वरीत व विनामूल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित व अधिघोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VICKRANT PRALHAD KHANDARE
Date: 2026.08.13 15:32:23 +0530

दिनांक : १३/०८/२०२६
ठिकाण : वर्धा

( विक्रांत प्र. खंदारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा
(फौजदारी न्यायालय क्र. १)

**<u>प्रमाणपत्र</u>**

या पी. डी. एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | जितेंद्र हि. जावळे, |
| कोर्टाचे नाव | : | श्री. वि. प्र. खंदारे,<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वर्धा.<br>(फौजदारी न्यायालय क्र. १) |
| पीठासीन अधिकाऱ्यांनी न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख | : | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड करण्यात आल्याची तारीख | : | १३/०८/२०२६ |

स्वा/—

दिनांक : १३/०८/२०२६ (जि. हि. जावळे)

ठिकाण : वर्धा लघुलेखक ग्रेड ३

प्रथमवर्ग न्यायालय क्र. १, वर्धा